## सर्वोच्च न्यायालयाच्या पल्याड

*सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे इतरही लोकशाही संस्थांना विश्वासार्हतेची समस्या भेडसावत आहे.*

'चहाच्या पेल्यातील वादळ' अशी संभावना करावं किंवा 'कौटुंबिक वाद' मानून सोडून द्यावं, अशी ही घटना निश्चितच नव्हे : सर्वोच्च न्यायालयातील चार ज्येष्ठ न्यायाधिशांनी १२ जानेवारी २०१८ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेवरून वादाला तोंड फुटलं आणि कोणतीही संस्था संशयातीत किंवा सुधारणातीत नाही, हे पुन्हा दिसून आलं. न्यायमूर्ती जे. चेलमेश्वर, रंजन गोगोई, मदन लोकूर व कुरियन जोसेफ यांनी नोव्हेंबर २०१७मध्ये भारताचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांना लिहिलेल्या पत्रात आपल्या असहमतीचे तपशील मितभाषी पद्धतीनं मांडले होते, परंतु त्यांची अस्वस्थता केवळ एका घटनेपुरती नव्हती तर ती सलग घटनाक्रमातून आलेली होती, हे आता पुरेसं स्पष्ट झालेलं आहे. कार्यकारण दाखवून देण्यासाठी हपापलेल्या माध्यमांनी घाईगडबडीनं या वादामागील कारणं मर्यादित करून टाकली. केंद्रीय अन्वेषण विभाग न्यायालयाचे न्यायाधीश बी. एच. लोया यांच्या डिसेंबर २०१४मध्ये अचानक झालेल्या मृत्यूच्या प्रकरणापुरता हा वाद आहे आणि यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेच्या सुनावणीसाठी निवडण्यात आलेल्या खंडपीठामुळं या न्यायमूर्तींनी जनतेसमोर जाऊन आपलं म्हणणं मांडण्याचं ठरवलं, अशी मांडणी माध्यमांकडून करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायाधिशांनी प्रसारमाध्यमांसमोर जाण्यामुळं औचित्यभंग झाल्याचा मुद्दा काहींनी उपस्थित केला आहे. परंतु भारतीय नागरिकांसाठी शेवटचा दिलासा असणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असायला हवं, याविषयी कुणाचं दुमत असणार नाही. सरन्यायाधिशांना पाठवण्यात आलेल्या पत्रात (पाहा : इपीडब्ल्यूमध्ये प्रकाशित पत्र, १३ जानेवारी २०१८) अंशतः तथ्य आहे, असं मानलं तरी अनेक चिंताजनक कारणं पुढं येतात. राजकीयदृष्ट्या संवेदनशील खटले जाणीवपूर्वक विशिष्ट खंडपिठांकडंच सोपवले जातात, बहुधा त्यांचा विशिष्ट निकाल लागणंही अपेक्षित असतं, हा या पत्रातील मध्यवर्ती मुद्दा होता. सरन्यायाधिशांच्या क्रमवारी व्यवस्थापनाविषयी सदर न्यायमूर्तींनी चिंता व्यक्त केली होती, ज्या नियमांचं पालन करणं अपेक्षित असतं, त्या नियमांपासून फारकत घेतल्यास 'न्यायालयाच्या सचोटीविषयी जनतेच्या मनात अप्रिय व अवांछित शंका निर्माण होतील.'

चार ज्येष्ठ न्यायाधीश आणि सरन्यायाधीश यांच्यातील तुटलेला विश्वासबंध आता पुन्हा कसा जुळवला जातो, ते येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. या प्रकरणावर निघणारा तोडगा लोकहितासाठी प्रचंड महत्त्वाचा आहे आणि न्यायसंस्थेच्या विश्वासार्हतेवर त्याचा परिणाम होईल, हे मात्र निर्विवादपणे स्पष्ट झालेलं आहे. देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या विश्वासार्हतेला तडा जाणं म्हणजे लोकशाहीवर झालेला आघात आहे, असं मत न्यायमूर्ती चेलमेश्वर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. परंतु, आपल्याला केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या विश्वासार्हतेचीच काळजी घेण्याची गरज आहे, असं नव्हे, तर लोकशाही रचना टिकवून ठेवणाऱ्या सर्वच संस्थांबाबत ही भूमिका ठेवणं आवश्यक आहे.

उदाहरणार्थ कायदेमंडळाकडं पाहाता येईल. गेल्या काही काळात कायद्यांवर चर्चा करण्यासंदर्भातील संसदेची भूमिका इतकी अर्थहीन झाली आहे, की आता तिचं अस्तित्व जवळपास शून्य झालं आहे. अलीकडंच संपलेल्या लोकसभेच्या- केवळ पंधरा दिवसांच्या- हिवाळी अधिवेशनामध्ये महत्त्वाच्या कायद्यांवर अत्यल्प वाद वा चर्चा झाली. 'मुस्लीम महिला (विवाहसंबंधित अधिकारांचं संरक्षण) अधिनियम, २०१७' हा याचाही यात समावेश होता. घाईगडबडीनं त्याला या अधिवेशनात मंजुरी मिळाली आणि आता या कायद्यासाठीचं विधेयक राज्यसभेत पाठवण्यात आलं आहे. संसदेचं असं वर्तन हा आता जवळपास नियम बनला आहे. करदात्यांच्या पैशांवर कार्यरत असलेले लोकप्रतिनिधी त्यांच्यासमोर उपस्थित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत विचार करण्याऐवजी केवळ संसद सभागृहाची शोभा वाढवत बसणार असतील, तर या संस्थेचा उद्देशच असफल होतो.

न्यायव्यवस्था आणि कायदेमंडळ यांच्यासोबतच संसदीय लोकशाहीमधील कार्यकारीसंस्थेनं कायदेमंडळाला उत्तरदायी असणं अपेक्षित आहे. परंतु विद्यमान कार्यकारीसंस्थेनं एखादा कायदा पुढं ढकलायचा असेल तेव्हा या अडचणीला ओलांडून जाण्याचे मार्ग शोधलेले आहेत. राज्यसभेत अडचण येऊ नये म्हणून बिगर-वित्तीय मुद्देही आर्थिक विधेयकामध्ये समाविष्ट करणं, हा यातला एक मार्ग आहे. आधीच्या सरकारांनीही अशा मार्गाचा अवलंब केला आहे, ही वस्तुस्थिती मांडून या बेफिकीर दृष्टिकोनाचं समर्थन करणं योग्य नाही. सरकारच्या कृतींचं समर्थन करण्याचा वा त्या नाकारण्याच्या लोकनियुक्त प्रतिनिधींच्या अधिकारावर गदा आणणारा हा दृष्टिकोन आहे. शिवाय, कायद्यात विशिष्ट तरतुदी असताना आणि न्यायालयानं आधीच काहीएक आदेश दिलेला असतानाही, या घटकांना बाजूला सारून सरकारनं 'आधार'ची सक्ती सुरू ठेवली तेव्हा संसद किंवा सर्वोच्च न्यायालय यांपैकी कुणीही काहीही बोललं नाही, हे आपण विसरता कामा नये.

यानंतर लोकशाहीचा चौथा स्तंभ येतो. भारतामधील तथाकथित 'स्वतंत्र' प्रसारमाध्यमं म्हणजे राजकीय संभाषिताला आणखी बिघडवणारा सर्वांत महत्त्वाचा घटक ठरावा. प्रत्येक मुद्द्याला केवळ दोन बाजू असल्यासारखं सुलभीकरण ही माध्यमं करतात. चर्चेसाठी किंवा मध्यभूमीसाठी कोणताही अवकाश ठेवला जात नाही. या कल्पित वादांमधील अंतिम निवाडा करण्याची भूमिका माध्यमांनी स्वतःकडं घेतलेली आहे. याला अर्थातच काही अपवाद आहेत, आणि माध्यमांमधील एका घटकाकडं जबाबदारीची काही जाणीव आहे, त्यामुळं सत्ताधाऱ्यांना वेळप्रसंगी प्रश्न विचारले जातात. परंतु, असे प्रसंग अधिकाधिक दुर्मीळ होत चालले आहेत.

आपलं स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्रसिद्ध असलेला भारतीय निवडणूक आयोगही अलीकडच्या काही निर्णयांमुळं स्वतःची विश्वासार्हता गमावण्याच्या दिशेनं चालला आहे. गुजरात विधानसभेच्या निवडणुका पुढं ढकलण्याला संमती देण्याचा निर्णय या संदर्भात पाहाता येतो. निवडणुका पुढं ढकलल्यामुळं विद्यमान सरकारला वस्तू आणि सेवा कराचा वापर करून व्यापारी समुदायाचं लांगूलचालन करण्यासाठी अधिक सहज अवकाश मिळाला. हा समुदाय मुख्यत्वे सत्ताधारी पक्षाचा समर्थक आहे.

त्यामुळं भारतातील लोकशाहीला असलेला धोका केवळ सर्वोच्च न्यायालयातील सद्यकालीन समस्येशी संबंधित नाही. न्यायसंस्थेतील ही समस्या अर्थातच गंभीर स्वरूपाची आहे. परंतु इतर अनेक संस्थांच्या विश्वासार्हतेमध्ये स्थिर व तीव्र स्वरूपाची घट होते आहे, ही बाबही तितक्याच गांभीर्यानं पाहायला हवी. ●

# सैनिकी राष्ट्रवादाच्या विरोधात

*झायॉनिझम (ज्यू राष्ट्रवाद) आणि हिंदुत्ववाद हे ज्यू धर्म व हिंदू धर्म यांचं प्रतिनिधित्व करत नाही, हे आपण लक्षात ठेवायला हवं.*

प्रदीर्घ काळ चाललेल्या शीतयुद्धामध्ये सोव्हिएत युनियनवर अमेरिकेनं विजय मिळवला आणि सोव्हिएत युनियन मोडून पडलं, त्यानंतर भारत व इस्राएल यांच्यात १९९२ साली संपूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. या संबंधांना २५ वर्षं पूर्ण होत असल्याचं निमित्त साधून इस्राएली पंतप्रधान बेंजामिन नेतान्यहू १४ ते १९ जानेवारी २०१८ या दिवसांमध्ये भारतदौऱ्यावर आले होते. यापूर्वी ४ ते ६ जुलै २०१७ या दिवसांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्राएलचा दौरा केला होता. पॅलेस्टाइनमध्ये ज्यू 'राष्ट्रभूमी' स्थापन करण्याचं आश्वासन ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी झायॉनिस्टांना (ज्यू राष्ट्रवाद्यांना) दिलं होतं, त्यानुसार १९१७ साली 'बालफोर जाहीरनामा' प्रसिद्ध करण्यात आला, त्याचा शंभरावा वर्धापनदिन साजरा होत असताना मोदींनी हा दौरा केला. झायॉनिस्ट नेतृत्वानं इस्राएल देशाची घोषणा १४ मे १९४८ साली केली होती, पण त्याचा सत्तरावा वर्धापनदिन या वर्षी होणार आहे. त्या वेळी वसाहतवादाची सामूहिक स्मृती बरीच पक्की होती. इस्राएलच्या निर्मितीसाठी क्रूरपणे हटवण्यात आलेल्या आणि वंचना सहन करणाऱ्या पॅलेस्टिनींच्या अधिकारांचा भंग झाल्याची दखल नेहरूकालीन भारत सरकारनं घेतली होती.

झायॉनिझम ही एक वसाहतवादी आणि वंशश्रेष्ठत्वाची विचारसरणी होती आणि आहे. अरबांच्या एतद्देशीय जनतेला हुसकावून लावण्याचं आणि त्यांना मानवाधिकारही नाकारण्याचं समर्थन ही विचारसरणी करते. झायॉनिझमला विरोध म्हणजे ज्यूविरोध नव्हे किंवा ज्यूद्वेष नव्हे. पॅलेस्टिनींविरोधातील आपली क्रूर कृत्यं जगभरातील ज्यूंच्या नावाखाली सुरू असल्याचा दावा करणारा इस्राएल सर्व ज्यूंच्या मानवतेलाच धोका उत्पन्न करणारा ठरतो. झायॉनिस्ट नेतृत्वाखालील इस्राएलनं बळानं पॅलेस्टिनी भूमीचा ताबा घेतलेला आहे. इस्राएलची राज्यसंस्था पॅलेस्टिनींना समपातळीवरून वागणूक देण्यास नकार देते. इस्राएली उप-साम्राज्यवादाविरोधातील पॅलेस्टिनी मुक्तीलढा हा अरब जगतामधील साम्राज्यवादाशी साथसंगत करणाऱ्या प्रतिगामी सत्तांविरोधातील व्यापक संघर्षाचा भाग आहे. वॉशिंग्टनच्या पाठिंब्यावर १९४८, १९६७ आणि १९७३ या तीन युद्धांदरम्यान इस्राएलनं जॉर्डन नदीच्या पश्चिमेकडील संपूर्ण प्रदेशावर प्रत्यक्ष ताबा मिळवलेला आहे. पॅलेस्टिनी लोकांना त्यांच्याच भूमीवर मर्यादित आणि नियंत्रित प्रवेश दिला जातो, त्यांना अतिशय निष्ठूरपणे अंकित ठेवलं जातं.

नेहरूंनंतरच्या भारतातील राजकीय मध्यस्थांनी कितीही निरनिराळ्या भूमिका घेतल्या, तरी त्यांचा पॅलेस्टाइनच्या प्रश्नासंबंधीचा खरा रंग १९९१ साली प्रकट झाला. झायॉनिझम हा वंशवाद आहे, असं प्रतिपादन करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या ठरावाला भारतानं १९७०च्या दशकाच्या मध्यात पाठिंबा दिला होता, परंतु १९९१ साली भारतानं या ठरावाच्या विरोधात मतदान केलं. गेल्या २५ वर्षांमधील इस्राएलसोबतचे भारताचे संबंध हे मुख्यत्वे सैनिकी स्वरूपाचे आहेत. इस्राएली शस्त्रांची विक्री, देशांतर्गत सुरक्षेविषयी इस्राएलची सल्लागार सेवा, तथाकथित दहशतवादविरोधी कारवाया आणि गुप्तचर सेवा यांमध्ये हे संबंध अधिक पसरलेले आहेत. भारत आता इस्राएलची सर्वांत मोठी शस्त्रास्त्र बाजारपेठ बनला आहे. 'जेन्स टेररीझम अँड सिक्युरिटी मॉनिटर'च्या गतकाळातील अंकांनुसार,

भारतीय पलटणी आणि गुप्तचर संस्थेतील कर्मचाऱ्यांना इस्राएलकडून प्रशिक्षण मिळतं आहे. पॅलेस्टिनी लढवय्यांविरोधात इस्राएली संरक्षण दलं आणि मोस्साद ज्या प्रकारचे विद्रोहविरोधी डावपेच वापरतं, तेच भारतात (काश्मिरी बंडखोरांविरोधात) वापरण्यासाठी हे प्रशिक्षण दिलं जातं आहे.

नेतान्यहू यांच्या दौऱ्यादरम्यान कोणत्याही नवीन संरक्षणविषयक कार्यक्रमांची किंवा कंत्राटांची घोषणा झाली नसली, तरी 'मेक इन इंडिया' उपक्रमाअंतर्गत संरक्षण सामग्रीच्या उत्पादनात इस्राएलची थेट परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञानाचं हस्तांतरण व्हावं यासाठी भारतानं निश्चितपणे प्रयत्न केले ('भारत–इस्राएल संयुक्त निवेदन', १५ जानेवारी २०१८). शिवाय, 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन'चं 'देशी' बनावटीचं रणगाडाविरोधी अस्त्र तयार होण्याची वाट न बघता इस्राएलच्या 'राफेल ॲडव्हान्स्ड डिफेन्स सिस्टम्स'चं 'स्पाइक' हे रणगाडाविरोधी अस्त्र आयात करण्यासाठी भारतीय सैन्य उतावीळ झालेलं आहे, त्यामुळं या संदर्भातील आंतरसरकारी करार लवकरच प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे. भारतीय सैन्यासाठी जमिनीवरून हवेत मारा करणारी मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रं संयुक्तरित्या विकसित करणं, गेल्या वर्षी इस्राएली हवाई दलानं आयोजित केलेल्या हवाई लढा कवायतीमध्ये भारतीय हवाई दलानं घेतलेला सहभाग आणि आता 'दहशतवादविरोधामधील सर्वांगीण सहकार्य'– या सर्व घडामोडींचा विचार करता भारताची सत्ता हिंदुत्ववादी नेतृत्वाकडं गेल्यानंतर भारत–इस्राएल यांच्यातील सैनिकी–सामरिक संबंध कधी नव्हे एवढे वेगानं पुढं चालले आहेत, हे नक्की.

हिंदुत्ववाद्यांना झायॉनिस्टांच्या सैनिकी राष्ट्रवादाचं आकर्षण कायमच वाटत आलेलं आहे. परंतु, आता 'दहशतवादविरोधातील सर्वांगीण सहकार्य' करताना भारतीय नेतृत्व इस्राएलचं आणखी अनुकरण करेल की काय? पॅलेस्टिनी लोकांना झायॉनिस्ट सत्ताधारी जी वागणूक देतात तशीच काश्मिरी लोकांना मिळावी अशी धोरणं आखली जातील की काय? असे प्रश्न उपस्थित होतात. ज्यू धर्म आणि झायॉनिझम यांच्यात फरक करता यायला हवा, त्याचप्रमाणे हिंदू धर्म आणि हिंदुत्ववाद यांच्यातही फरक करता यायला हवा. हिंदू धर्म हा धार्मिक धारणा व श्रद्धांचा संचय आहे, त्यात अध्यात्मिक मुक्ती हे ध्येय आहे. तर, हिंदुत्ववाद ही फॅसिस्ट विचारसरणी आहे– किंबहुना नाझीवादाचं हे भारतीय रूप आहे. झायॉनिझम हे ज्यू धर्माच्या विरोधात जाणारं तत्त्व आहे, त्याचप्रमाणे हिंदुत्ववाद हे हिंदू धर्मालाच छेद देणारं तत्त्व आहे. झायॉनिस्ट आपलं प्रतिनिधित्व करत नाहीत, असं ज्यूंना ठासून सांगावं लागतं. त्याचप्रमाणे हिंदुत्ववादी आपलं प्रतिनिधित्व करत नाहीत हे हिंदूंनीही जाहीर करण्याची वेळ आली आहे. या लढ्यामध्ये हिंदू, ज्यू किंवा मुस्लीम या सर्वांनी मानवता व पॅलेस्टाइन, मानवता व काश्मीर यांच्या बाजूनं उभं राहायला हवं. ज्यूद्वेष (ज्यू आणि इतर सेमाइट– यांमध्ये पॅलेस्टिनीही आले– यांच्याविरोधातील पूर्वग्रह) आणि मुस्लीमविरोध (मुस्लिमांविरोधातील पूर्वग्रह) यांनाही आपण संपुष्टात आणायला हवं.

●

---

## अस्ताव्यस्त 'आधार'

*आधार प्रकल्पातील धोकादायक अस्ताव्यस्ततेबद्दल सरकार आणि यूआयडीएआय यांनी नागरिकांना उत्तरदायी असायला हवं.*

'यूनिक आयडेन्टिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया'कडं (यूआयडीएआय) असलेला लाखो भारतीयांच्या

वैयक्तिक माहितीचा प्रचंड साठा किती असुरक्षित आहे, ही वस्तुस्थिती मांडण्यात येते तेव्हा प्रत्येक वेळी हे प्राधिकरण स्वतःचा बचाव करण्याची अधिकाधिक तीव्र खटपट करत राहातं. एका दलालाला केवळ पाचशे रुपये देऊन आधारशी संबंधित माहिती आपण कशी विकत घेतली, याचं वार्तांकन चंदिगढस्थित 'ट्रिब्यून' वर्तमानपत्राच्या एका बातमीदारानं अलीकडंच केलं. त्याला प्रत्युत्तर देताना यूआयडीएआयनं या पत्रकार महिलेविरोधातच तक्रार दाखल केली. या प्रकरणात माहितीच्या साठ्याला कोणतीही हानी पोचलेली नाही, असं प्राधिकरणानं सांगितलं. पण नंतर, स्वतःची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांना आणखी एक पाऊल उचलावं लागेल, अशी तजवीजही केली. या प्राधिकरणानं चालवलेली फसवणूक उघड करण्याची वेळ निश्चितपणे आलेली आहे.

इतकी विस्तृत व सर्वव्यापी व्यवस्था असलेला आधार प्रकल्प धोकाग्रस्त अवस्थेत आहे. या प्रकल्पाद्वारे साठवण्यात आलेली माहिती अनधिकृतरित्या उपलब्ध झाल्याच्या, ती प्रसिद्धी करण्यात आल्याच्या आणि गैरवापर झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. याचा ताजा दाखला 'ट्रिब्यून'च्या वार्तांकनाद्वारे देण्यात आला. अनधिकृत दलाल लोकसांख्यिक माहितीची विक्री कशा रितीनं करत आहेत, हे या वार्तांकनात उघड करण्यात आलं होतं. यापूर्वी 'एअरटेल पेमेन्ट बँके'नं आपल्या मोबाइल ग्राहकांची सहमती न घेता त्यांच्यासाठी खाती तयार केली होती आणि त्यांच्या प्राथमिक बँक खात्यांमधून थेट लाभ हस्तांतरणाद्वारे प्राप्त झालेला पैसा या पेमेन्ट बँकेच्या खात्यांकडं वळवला होता, हे प्रकरण गाजलेलं आहे. शिवाय, इतर अनेक सरकारी संकेतस्थळांप्रमाणे झारखंडच्या एका सरकारी संकेतस्थळावरून लाखो निवृत्तीवेतनधारकांचे आधार क्रमांक, बँक खात्यांचा तपशील, नावं आणि पत्ते प्रसिद्ध करण्यात आले होते.

या संदर्भात लोकक्षोभ उसळल्यावर, जैवसांख्यिक माहिती सुरक्षित असल्याचा पुनरुच्चार यूआयडीएआय करत राहातं. संबंधित संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेले आधार क्रमांक लोकांना कोणताही खराखुरा धोका निर्माण करणार नाहीत... जैवसांख्यिक माहिती उपलब्ध नसेल तर केवळ लोकसांख्यिकी माहितीच्या प्रकाशनातून कोणताही गैरवापर शक्य नाही. (यूआयडीएआयचं प्रसिद्धीपत्रक, २० नोव्हेंबर २०१७). लोकसांख्यिक माहितीचं प्रकाशन हा बिनमहत्त्वाचा मुद्दा आहे, असं सांगून आपल्याकडील माहितीच्या गोपनीयतेचा कोणताही 'भंग' झाला नसल्याचा दावा हे प्राधिकरण हेकेखोरपणे करत राहातं. आपल्या सुविधेची 'संपूर्ण नोंद' ठेवली जाते, त्यामुळं 'कोणताही गैरवापर शोधता येण्याजोगा' असतो, असा दावाही केला जातो. परंतु, 'ट्रिब्यून'मधील वार्तांकनात नोंदवलेल्या प्रमाणातील गैरवापर नजरेआड कसा झाला, याचं स्पष्टीकरण मात्र प्राधिकरणाला देता येत नाही.

पश्चातबुद्धी दाखवत यूआयडीएआयनं पाच हजार अधिकाऱ्यांना या व्यवस्थेपासून प्रतिबंधित केलं आहे आणि नवीन द्विस्तरीय सुरक्षाव्यवस्था लागू केली आहे ('व्हर्चुअल आयडी' आणि 'लिमिटेड केवायसी/नो यूअर कस्टमर'). खाजगी उपयोजनकर्त्यांनी आधारसाठीच्या लाखो अर्जांवरील प्रक्रिया पूर्ण केली, त्यानंतर गेल्या वर्षी हे काम सरकारी केंद्रांकडं, बँकांकडं आणि टपाल कार्यालयांकडं देण्याचा निर्णय यूआयडीएआयनं घेतला. वस्तुस्थिती समोर आल्यानंतर कृती करण्याची सवय आधार प्रकल्पाच्या व यूआयडीएआयच्या सुरुवातीपासून दिसत आली आहे. परिणामांचा पूर्वविचार न करता निर्णय घेण्याची प्राधिकरणाची ही वृत्ती प्रत्येक टप्प्यावर आपल्याला सहन करावी लागली आहे. कायदा होण्याच्या आधीच यूआयडीएआयची स्थापना करणं आणि नोंदणी व जोडणीची प्रक्रियाही सुरू करणं, इथपासून ही पद्धत

अवलंबण्यात आलेली दिसते. माहितीचं संरक्षण आणि खाजगीपणा यांच्याविषयी सुरक्षिततेची कोणतीही नियमावली किंवा कायदा अस्तित्वात येण्याच्या आधीच आपल्या जगण्याच्या प्रत्येक अंगाला या प्रकल्पानं व्यापून घेतलं. दरम्यान, जन्माच्या दाखल्यापासून ते मृत्यूच्या दाखल्यापर्यंत प्रत्येक सेवेच्या उपलब्धततेसाठी आधार क्रमांक सादर करावा अशी सक्ती सरकारनं नागरिकांवर सातत्यानं चालवली आहे. ही सक्ती आता विकृती म्हणावी अशा पातळीला पोचल्याचं एक उदाहरण अलीकडंच उत्तर प्रदेशात दिसून आलं. रात्रीचा निवारा मागणाऱ्या बेघरांनीही आधार क्रमांक द्यावा, अशी मागणी उत्तर प्रदेश राज्य सरकारनं केली होती. आधार क्रमांक नसलेले लोक 'भारतीय संघराज्याच्या दृष्टीनं किंवा उत्तर प्रदेश सरकारच्या दृष्टीनं अस्तित्वातच नाहीयेत का,' असा प्रश्न या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाला विचारावा लागला होता.

सरकारनं सुरुवातीला निर्धारित केलेल्या मर्यादेपलीकडं आधारचा गैरवापर होण्याला आव्हान देणारी याचिका २०१५ सालापासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या खटल्यातील सुनावणी १७ जानेवारीपासून पुन्हा सुरू होणार आहे. आधार प्रकल्प कसा व का सुरू झाला आणि त्याचा विस्तार कशा प्रकारे झाला, यासंबंधीचे मुद्दे सर्वोच्च न्यायालयाला लक्षात घ्यावे लागतील. त्याचसोबत, माहितीच्या संरक्षणासंबंधीच्या गंभीर त्रुटी, आधारसंबंधित समस्यांमुळं नागरिकांना सेवा आणि अधिकार नाकारणं, माहितीपूर्ण सहमती आणि खाजगीपणा या तत्त्वांचा भंग, आणि महत्त्वाचं म्हणजे या समस्यांवर तोडगा काढण्यात यूआयडीएआयला आलेलं अपयश- यासंबंधीही न्यायालयात खल होणं गरजेचं आहे. आपल्या नियंत्रणाखालील संवेदनशील लोकसांख्यिकी माहिती पुरेशा प्रमाणात संरक्षित करण्यात अपयशी ठरलेल्या यूआयडीएआयसारख्या प्राधिकरणाला आवर कसा घालता येईल? भारतातील माहिती संरक्षणाविषयीच्या आपल्या श्वेतपत्रिकेमध्ये बी. एन. श्रीकृष्ण समितीनं माहिती संरक्षण कायद्यासंबंधी एक महत्त्वाचं तत्त्व अधोरेखित केलं होतं : पुरेशी कार्यक्षमता असलेल्या उच्चाधिकारी वैधानिक प्राधिकरणाद्वारे माहिती संरक्षणाच्या रूपरेषेची अंमलबजावणी व्हावी, हे ते तत्त्व होतं. अशा प्रकारच्या प्राधिकरणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्तित्वात असलेल्या अनेक पद्धती व पायंड्यांची नोंदही या श्वेतपत्रिकेत करण्यात आली होती. यूआयडीएआयपासून हे प्राधिकरण अर्थातच स्वतंत्र असावं आणि यूआयडीएआयवर चाप ठेवण्याचे अधिकार त्याच्याकडं असावेत.

माहितीच्या युगामध्ये आपण प्रवेश करतो आहेत, अशा वेळी व्यक्तीची ओळख माहितीचा स्रोत बनते. ही माहिती केवळ राज्यसंस्थेसाठीच नव्हे तर खाजगी कंपन्यांसाठीही मूल्यवान असते. भारतामध्ये आधार प्रकल्पाची अंमलबजावणी ज्या प्रकारे झाली आहे त्यावरून व्यक्तिगत नागरिकांच्या खाजगीपणाच्या अधिकाराविषयीचा सरकारचा निष्काळजीपणा दिसून येतो. विशेष म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायालयानं अलीकडंच या अधिकाराचं महत्त्व प्रस्थापित केलं आहे. सर्वोच्च न्यायालय पुन्हा या अधिकारावर शिक्कामोर्तब करेल आणि ('आधार'संदर्भातील) चुकांची दुरुस्ती करेल, अशी आशा करू.

●

---

## गुंतवणुकीवर लक्ष

*भारताच्या जीडीपी वृद्धी दराची गती मंद आहे आणि गुंतवणूक कमी आहे व घटते आहे.*

भारताची अर्थव्यवस्थेच्या वाढीची सध्याची गती गेल्या चार वर्षांमधील सर्वांत मंद आहे, असा अंदाज केंद्रीय

सांख्यिकी कार्यालयानं (सीएसओ : सेंट्रल स्टॅटिस्टिकस ऑफिस) ५ जानेवारीला प्रसिद्ध केलेल्या 'राष्ट्रीय उत्पन्नाचे पहिला आगाऊ अंदाज, २०१७-१८' या दस्तावेजात वर्तवण्यात आला आहे. अर्थव्यवस्थेसंबंधीच्या सहा ते आठ महिन्यांमधील आकडेवारीचा वापर करून वर्तवण्यात आलेल्या या अंदाजांचा उपयोग १ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पातील मांडणीसाठी केला जाईल. गेल्या वर्षापेक्षा पुढील वर्षी गुंतवणुकीत वाढ होण्याबाबत सरकार आशावादी असलं, तरी अर्थव्यवस्थेच्या वृद्धिक्षमतेचा कळीचा निर्देश करणारी 'सकल घरेलू उत्पन्ना'च्या (जीडीपी : ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट) प्रमाणातील 'सकल स्थिर भांडवल उभारणी' (जीएफसीएफ : ग्रॉस फिक्स्ड कॅपिटल फॉर्मेशन) सध्या (म्हणजे २०११ सालापासूनचा विचार करता) निचांकी आहे. 'राष्ट्रीय लेखापालन सांख्यिकी' (एनएएस : नॅशनल अकाउन्ट्स स्टॅटिस्टिक्स) मालिका २०११ साली सुरू झाली, तेव्हापासूनचा विचार या आकडेवारीत केलेला आहे. शिवाय, २०१६-१७ सालातील निश्चलनीकरण आणि २०१७-१८ साली लागू झालेला वस्तू व सेवा कर यांमुळंही या अंदाजांमध्ये संदिग्धता दिसते.

हातात आलेल्या आकडेवारीकडून काय अपेक्षा ठेवाव्यात, हे समजून घेण्यासाठी ही आकडेवारी काय सांगतेय याचा थोडक्यात सारांश देणं गरजेचं आहे. या आकडेवारीच्या अंदाजानुसार, २०१७-१८ साली वास्तव जीडीपी ६.५ टक्क्यांनी वाढेल. गेल्या आर्थिक वर्षासाठीचा हा अंदाजी आकडा ७.१ टक्के होता. स्थिर किंमतींच्या संदर्भात सकल मूल्यवृद्धी (जीव्हीए: ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) ६.१ टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षीच्या हंगामी अंदाजांनुसार ही वाढ ६.६ टक्के इतकी होती. जीडीपीचा आणखी एक घटक असलेले उत्पन्नावरील निव्वळ कर गेल्या वर्षीपेक्षा मंद गतीनं- १०.९ टक्क्यांनी वाढतील, अशी अपेक्षा आहे. जीएसटीमुळं अप्रत्यक्ष करमहसुलाची वसुली मंदावल्यामुळं हे झालं आहे.

बहुतांश लोकांना रोजगार पुरवणारं शेती क्षेत्र गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी खराब कामगिरी करेल, असं जीव्हीएच्या आकडेवारीवरून स्पष्ट होतं. गेल्या काही वर्षांमधील शेती क्षेत्राच्या वृद्धी दरांमध्ये माफक सुधारणा झाल्याचा कल दीर्घकालीन आकडेवारीवरून दिसतो. एकूण जीव्हीएमधील शेती क्षेत्राचा वाटा घटत चालल्याचा सातत्यपूर्ण कल दिसतो आहे (या वर्षी हा वाटा १४.६ टक्के असल्याचा अंदाज आहे), यासंबंधीचं स्पष्टीकरण या अपुऱ्या सुधारणेद्वारे मिळतं. सेवा क्षेत्राचा जीव्हीएमधील वाटा ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे आणि गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी सेवा क्षेत्राची वाढ किरकोळ प्रमाणात चांगली होईल, अशी अपेक्षा आहे. परंतु, 'पर्चेजिंग मॅनेजर्स इंडेक्स' याबाबत अधिक आशावादी आहे आणि वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीमध्ये वाढीविषयी सकारात्मक चिन्हं दिसत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. गेल्या सहा महिन्यांत जागतिक व्यापाराला गती प्राप्त झाली असली तरी निर्यातीच्या आघाडीवरही भारताची कामगिरी मर्यादित समाधानकारकच राहिली आहे.

सर्वसाधारणपणे सीएसओमध्ये आधीच्या आकडेवारीच्या सुधारित अंदाजांवरून विद्यमान अंदाज काढले जातात. त्यामुळं जीव्हीए वृद्धी दरांच्या प्रारंभिक पूर्ण वर्षीय अंदाजांना उर्ध्वमुखी पूर्वग्रहाचा लाभ होण्याची शक्यता असते. त्यानंतरच्या सुधारणांद्वारे हा दर कमी होत जातो. किमान आत्तापर्यंत तरी या आकडेवारीचा कल असा राहिला आहे. परंतु वृद्धी दर सुधारित स्वरूपातही वरच्या दिशेनंच जात राहातील, अशी सरकारची अपेक्षा असल्याचं दिसतं. २०१७-१८ या आर्थिक वर्षातील दुसरी सहामाही पहिलीपेक्षा चांगली असेल, अशी सरकारची धारणा आहे. एनएएस आकडेवारीचा आत्तापर्यंतचा कल आणि आर्थिक

कृतींसंबंधीचे इतर निर्देशांक अशा कोणत्याही शक्यतेचं सूचन करताना दिसत नाहीत.

परंतु, विद्यमान वर्षाच्या पुढील अंदाजांमध्ये उर्ध्वमुखी सुधारणा झाली, तर ती वृद्धी दरांना सांख्यिकीदृष्ट्या उत्तेजन देणारी ठरेल, असा युक्तिवाद काही विश्लेषक करतात. जानेवारी २०१८च्या अखेरीस प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या सुधारित अंदाजांमध्ये २०१६-१७ या निश्चलनीकरणाच्या वर्षाच्या वृद्धी दरांमध्ये घट दाखवणारी सुधारणा केली जाईल, या अपेक्षेवर हा युक्तिवाद आधारलेला आहे. 'पायाभूत संख्या कमी' धरल्याचा परिणाम यातून साधला जाईल आणि विद्यमान वर्षाचा वृद्धी दर गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला असल्यासारखा वाटेल. अर्थात फेब्रुवारीच्या अखेरीस येणाऱ्या दुसऱ्या सुधारित अंदाजांमध्ये परिस्थिती पुन्हा बदलेल. निश्चलनीकरणाचे नकारात्मक स्थूल-अर्थशास्त्रीय परिणाम दाखवणारी चांगली गुणवत्तापूर्ण आकडेवारी पाहाता ही शक्यता प्रत्यक्षात येईलही. परंतु, २०१६-१७ आणि २०१७-१८ या दोन्ही वर्षांच्या अंदाजांमध्ये अधोमुखी सुधारणा झाली, तर आश्चर्य वाटू नये.

वृद्धी मोजण्याच्या संख्याशास्त्रीय बाजू दूर ठेवल्या तरी अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा सर्वांत महत्त्वाचा निर्देशक- म्हणजे गुंतवणूक- जीएफसीएफच्या संदर्भानं पाहिला असता उताराची दिशाच दाखवतो आहे. खाजगी आणि सार्वजनिक अंतिम उपभोग खर्च वृद्धी हे इतर दोन महत्त्वाचे निर्देशक आहेत, त्यांमध्येही गत वर्षापेक्षा २०१७-१८मध्ये घट होण्याची शक्यता आहे. जीडीपीच्या प्रमाणात जीएफसीएफमध्ये निःसंशयपणे घट झाली आहे. २०११ साली हा आकडा ३४.३ टक्के होता, तो आता २९ टक्क्यांवर आला आहे. २००४-०५ ते २०११-१२ या काळात वृद्धी दराचा जो कल दिसत होता त्याकडं परत जाण्यासाठी गरज आहे तितक्या प्रमाणात गुंतवणूक वाढत नाहीये. गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी तीन वर्षं प्रयोग करून झाले, सोबतच केंद्रीय अर्थसंकल्पावर अवाजवी वित्तीय मर्यादा स्वतःहूनच लादल्या गेल्या, या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी सरकारकडं निवडीसाठी एक पर्याय आहे. मूल्यांकन संस्थांकडं दुर्लक्ष करून रोजगारनिर्मितीवर आणि सुरक्षित उपजीविकेवर अधिक खर्च करावा, शिवाय अर्थव्यवस्थेच्या क्रयशक्तीमध्ये वाढ करावी.

अशा वेळी सरकारचं लक्ष कशावर केंद्रीत असायला हवं? भडक राजकीय क्लृप्त्या सरकारनं टाळण्याची गरज आहे. निश्चलनीकरण आणि जीएसटीची घाईगडबडीनं झालेली अंमलबजावणी हे निर्णय अर्थव्यवस्थेसाठी चांगले नव्हते. ग्रामीण पायाभूत सुविधा, शेतीमधील सरकारी गुंतवणूक, ग्रामीण बिगरशेतकी रोजगार, मुख्यतः उत्पादन क्षेत्रातील रोजगारनिर्मिती, आणि आरोग्य व शिक्षण यांसारख्या लोकसेवा यांना अभिमुख असलेल्या विचारी धोरणांवर गुंतवणूक करण्यावर लक्ष केंद्रीत करायला हवं. यातून उत्पन्नांमध्ये वाढ होईल, आणि अर्थव्यवस्थेला गुंतवणुकीसाठी आवश्यक उत्तेजना देणारी मागणी निर्माण होईल.

●

---

## जुलमाची क्रमवारी

*व्यवसायसुलभतेचा निर्देशांक अजून वापरात का आहे?*

जागतिक बँक गटाकडून (वर्ल्ड बँक ग्रुप : डब्ल्यूबीजी) प्रकाशित केला जाणारा, दिशाहीन परंतु लोकप्रिय असलेला, व्यवसायसुलभता निर्देशांक (ईज ऑफ डुइंग बीझनेस : ईडीबी) पुन्हा एकदा छाननीखाली आला

आहे. या निर्देशांकाचा समावेश असलेल्या 'डुइंग बीझनेस' या अहवालाबाबत जागतिक बँकेचेच मुख्य अर्थशास्त्रज्ञ पॉल रोमर यांनी शंका उपस्थित केल्या आहेत. विशेषतः चिलीच्या स्थानामध्ये अचानक मोठा उतार दिसून आल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हे क्रम काढण्याच्या पद्धतीमध्ये बदल झाले, त्याचा अंशतः परिणाम या क्रमबदलावर झाला आहे. २००६पासून चिलीच्या स्थानामध्ये २५व्या क्रमांकावरून ५७व्या क्रमांकापर्यंतचा उतार दिसून आला. मिशेल बॅचलेट यांच्या समाजवादी पक्षाच्या सत्ताकाळात या निर्देशांकातील चिलीचं स्थान सातत्यानं खाली गेलं, आणि रुढतावादी (कॉन्झर्वेटीव) सेबास्टिन पिनेरा सत्तेवर आल्यानंतर चिलीला वरचा क्रमांक मिळाला होता. या संदर्भात उघडच असलेला मुद्दा रोमर यांनी मांडला आहे : एखाद्या निर्देशांकाचं समीकरण मांडताना चल घटक बदलले, म्हणजे त्याच्या पद्धतीशास्त्रामध्ये बदल केला, की क्रमवारी आधीच्या वर्षांशी तुलनात्मक राहात नाही. किमान गेल्या चार वर्षांसाठी सातत्यपूर्ण पद्धतीचं समीकरण वापरून जागतिक बँक पुन्हा क्रमवारी तयार करेल, असं त्यांनी म्हटलं आहे. या क्रमवारीविषयी रोमर यांनी उपस्थित केलेली शंका स्वागतार्ह असली, तरी या अहवालासंबंधीच्या आणि विशेषतः व्यवसायसुलभता निर्देशांकाविषयीच्या गंभीर समस्या मांडणारं पुरेसं संशोधन यापूर्वीच झालेलं आहे.

'डुइंग बीझनेस' या अहवालामध्ये कायदेशीर नियमनं आणि पद्धती यांच्यासंबंधीची माहिती जमवली जाते आणि व्यावसायिक पर्यावरणाचं मूल्यमापन केलं जातं. हा अहवाल पहिल्यांदा २००३ साली प्रकाशित झाला होता. संबंधित देशातील सर्वांत मोठ्या (आणि काही वेळा दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या) उद्योग शहरामधील मध्यम आकाराच्या 'नमुनेदार' खाजगी कंपनीला लागू होणाऱ्या नियमनांचा विचार हा अहवाल करतो. औपचारिक अर्थव्यवस्थेसाठी मांडण्यात आलेल्या धोरणांचं मूल्यमापन हा अहवाल करतो, परंतु यामध्ये देशा-देशामधील नियमनविषयक भिन्नतेकडं दुर्लक्ष केलं जातं आणि अंमलबजावणी अथवा दैनंदिन व्यवसायविषयक उपयोजनांचं मूल्यमापन हा अहवाल करत नाही. डब्ल्यूबीजीनं २००६ सालापासून व्यवसायसुलभता निर्देशांक काढण्यासाठी विविध निर्देशांकांचं एकत्रीकरण सुरू केलं. जागतिक बँकेच्या सशर्त कर्जपुरवठा धोरणांना मार्गदर्शन होण्यासाठीही या निर्देशांकाचा वापर होत होता, परंतु कठोर टीका झाल्यानंतर २००९ सालापासून ही पद्धत बंद करण्यात आली. डब्ल्यूबीजीचे अध्यक्ष जिम योंग किम यांनी २०१३ साली या अहवालासंबंधी स्वतंत्र समितीकडून परीक्षण करवून घेतलं होतं. या परीक्षणामध्ये तर व्यवसायसुलभता निर्देशांक प्रकाशित करू नये, असं सुचवण्यात आलं होतं. अशा प्रकारे जमवलेल्या माहितीमधून आंतरराष्ट्रीय तुलना करता येत असल्या तरी, ही आकडेवारी एकत्र करून निर्देशांकाधारीत क्रमवारी तयार करणं चुकीचं आहे आणि त्यातून दिशाभूलही होऊ शकते, असं या परीक्षणात मान्य करण्यात आलं होतं. तरीही, ही क्रमवारी प्रकाशित होतेच आहे.

अर्थशास्त्र आणि संख्याशास्त्र यांमध्ये निर्देशांकांची उभारणी हे अतिशय गुंतागुंतीचं तंत्र आहे. विविध कारक घटकांचं एकत्रीकरण करण्याचा एक मार्ग निर्देशांकांद्वारे उपलब्ध होतो. परिमाणांचं वजन आणि निवड यांमुळं तुलनेच्या वस्तुनिष्ठ पद्धतींना दडपलं जाऊ शकतं. दोन कारक घटकांचं एकत्रीकरण करण्याचे 'वाजवी' मार्ग अर्थातच असतात, परंतु परिणामांवर पूर्वग्रहांचा प्रभाव पडण्याची शक्यता जास्त असते. व्यामिश्र घटितांना तुलना करण्याजोग्या आकड्यांच्या सुलभ रूपात आणणं हा निर्देशांकाचा सर्वांत मोठा गुण ठरतो. या सुलभीकरणामुळंच क्रमवाऱ्या लोकप्रिय होतात

आणि शक्तिशालीही बनतात, त्यातूनच अनेकदा त्या धोकादायक ठरतात व बरेचदा धोरणनिर्मितीसाठीचं दिशाभूल करणारं साधन ठरतात. विशिष्ट रचनेतील सर्व सहभागी घटक अशा क्रमवाऱ्यांवर विश्वास ठेवतात, असं नाही. परंतु त्यांची व्यापक प्रसिद्धी केली जाते आणि त्याकडं दुर्लक्ष करणं आता अशक्य बनलं आहे. या निर्देशांकाच्या पद्धतीशास्त्राबद्दलच्या चर्चेला फारसं महत्त्व दिलं जात नाही, परंतु अर्थहीन क्रमबदलांकडं अवाजवी लक्ष दिलं जातं.

अशा क्रमवारीत वरचं स्थान मिळवण्यासाठी आपल्या धोरणांमध्ये बदल करण्यापर्यंत सरकारांची मजल जाते, ही यातील अधिक चिंताजनक बाब आहे. औद्योगिक धोरण व वृद्धी यासंबंधी भारत सरकारनं तयार केलेल्या 'उत्पादन-निष्पत्ती रूपरेषा दस्तावेज २०१७-१८'मध्ये, २०१७-१८ या वर्षी व्यवसायसुलभता निर्देशांकात नव्वदावं स्थान मिळवणं आणि २०२० सालापर्यंत तिसाव्या क्रमांकापर्यंत पोचणं हे सरकारचं उद्दिष्ट असल्याचं म्हटलं आहे. गेल्या वर्षी भारताचं या क्रमवारीतील स्थान १३०व्या क्रमांकावर होतं, त्याला बढती मिळून आता भारत १००व्या स्थानावर आहे- यासंबंधी मोठ्या प्रमाणावर बातम्या येऊन गेलेल्या आहेतच. उदाहरण म्हणून बघायचं तर, 'डुइंग बीझनेस' अहवालातील 'पत-स्वीकार' निर्देशांकामध्ये भारताचा क्रमांक २९ आहे. पत उपलब्धतेच्या आघाडीवर भारताची कामगिरी चांगली होतेय अशी प्रतिमा यातून निर्माण होते, परंतु अनेक उद्योजकता सर्वेक्षणांमधून आणि संशोधनांमधून याच्या विपरित परिस्थिती समोर येताना दिसते. वास्तविक हा निर्देशांक 'पत वार्तांकन व्यवस्थांची क्षमता आणि तारण व दिवाळखोरी कायद्यांची कर्जसुलभतेसंबंधीची परिणामकारकता' यांचं मोजमाप करतो, 'पत उपलब्धतते'चं मोजमाप करत नाही. 'डुइंग बीझनेस' अहवालात दिशाभूल करणाऱ्या संज्ञा वापरण्यात आल्या आहेत आणि त्याचा अर्थव्यवस्थांविषयीच्या लोकआकलनावर दीर्घकालीन परिणाम होतो, असं अनेक परीक्षणांमध्ये नोंदवण्यात आलं आहे. व्यवसायविषयक पर्यावरणाचं सर्वांगीण मोजमाप या निर्देशांकांमधून समोर येत असल्यासारखं या संज्ञावापरातून सूचित होतं. वास्तविक केवळ कागदोपत्री नियमनांचाच विचार यात झालेला असतो. या निर्देशांकाला पूरक गोष्टींच्या बाजूनं धोरणात्मक बदल करण्याकडं सरकारांचा कल होतो. निर्देशांकात वरचं स्थान मिळवण्यासाठीची ही भूमिका देशातील लोकांच्या किंवा अर्थव्यवस्थेच्या गरजांना पूरक असतेच असं नाही. निर्देशांकातलं स्थान आणि थेट परकीय गुंतवणूक यांचा सकारात्मक परस्परसंबंध असतो, हा दृष्टिकोन समस्याग्रस्त आहे, किंबहुना या क्रमवारींचाच हा विपरित परिणाम आहे.

'व्यवसायसुलभते'साठी सर्वांकरता एकच साचा वापरण्याचा हा दृष्टिकोन विविध देशांमधील विकासाच्या भिन्न संदर्भांकडं दुर्लक्ष करतो. विकासाचे आपले संदर्भ आणि मार्ग यांचा अनादर करून या निर्देशांकाच्या अटी देशांनी पूर्ण केल्या तर त्यांना क्रमवारीत वरचं स्थान मिळत जातं. हे म्हणजे फूटबॉलच्या विश्वचषकासारखं झालं, त्यात सगळ्यांना खेळण्यासाठी एकच नियमसंच आखून दिलेला असतोच, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे एका प्रकारच्या डावपेचांना दुसऱ्या प्रकारापेक्षा जास्त वरचढ मानून बक्षिस दिलं जातं! 'डुइंग बीझनेस' अहवालानं स्वतःच कबूल केल्यानुसार, त्याचा उद्देश धोरणात्मक आदेश देणं किंवा नमुना आखून देणं हा नसून त्यासाठी माहिती पुरवणं, एवढाच आहे; परंतु प्रत्यक्षात क्रमवारीतून नमुनेच आखून दिले जातात. आता नव्यानं उपस्थित झालेल्या वादातून तरी जागतिक बँकेनं यासंबंधी पुनर्विचार करावा आणि व्यवसायसुलभता निर्देशांक मुदलातच रद्द करून टाकावा. ●

## बिटकॉईन–ब्लॉकचेनचा बुडबुडा

*संपत्ती किंमतीला आलेला ताजा फुगवटा हे खाजगी मालमत्तेबद्दल भांडवलशाहीला असलेल्या अविवेकी हव्यासाचं एक लक्षण आहे.*

शिकागो बोर्ड ऑप्शन्स एक्सेंजमध्ये १० डिसेंबर २०१७ रोजी बिटकॉइन या आभासी चलनाद्वारे भविष्यकालीन व्यापार (फ्युचर्स ट्रेडिंग) करण्याची सुरुवात झाली. त्यानंतरच्या आठवड्यात अधिक मोठ्या शिकागो मर्कन्टाइल एक्सेंजमध्येही या चलनाचा वापर झाला. अनियामक विनिमयाद्वारे व्यापार करण्यावर आपल्या नियमांनी निर्बंध सहन कराव्या लागणाऱ्या बड्या संस्थात्मक गुंतवणूकदारांना आता आणखी एक नवीन वित्तीय साधन हाताशी मिळालं आहे. बिटकॉइनच्या किंमती वाढत चालल्या असताना बडे संस्थात्मक गुंतवणूकदार यातून प्रचंड भांडवली लाभ उठवण्याची संधी साधण्यापासून फार काळ मागं राहिले नसतेच. किंमतीमध्ये प्रचंड अस्थिरता असली तरीही एका वेळी -डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात- बिटकॉइननं २० हजार डॉलरांपर्यंत मजल मारली होती. जानेवारी २०१७मध्ये हा आकडा एक हजार डॉलर होता. या पार्श्वभूमीवर हा सट्टेबाजीचा बुडबुडा कधी फुटेल या विषयी चिंता व्यक्त होत होत्या. बिटकॉइनचं हे सट्टेबाजीतलं वेड अतिशय जोखमीचं आहे, अशी टीका केंद्रीय बँकांनी आणि वित्तीय अधिकारीसंस्थांनी केलेली असूनही बिटकॉइन व इतर आभासी चलनांमध्ये विशेषतः गुंतलेल्या बचाव निधींना चांगले दिवस आल्याचं दिसतं आहे.

खरं तर, वित्तीय महासंकटानंतर फेडरल रिझर्व, युरोपीय केंद्रीय बँक आणि बँक ऑफ जपान यांसारख्या केंद्रीय बँकांनी स्वीकारलेल्या 'संख्यात्मक सहजते'च्या (अर्थकारणाला चालना देण्यासाठी केंद्रीय बँकांनी शासकीय रोखे व अन्य वित्तीय मत्ता विकत घेणे) आर्थिक धोरणामुळंच ही अभूतपूर्व रोकडसुलभता निर्माण झाली आहे. यामुळं संपत्ती बाजारपेठांमध्ये (रोखे, बंधपत्र, इतर वित्तीय संपत्ती, स्थावर मालमत्ता, इत्यादी) सट्टाधारीत गुंतवणूक झाली, त्यातून संपत्ती मूल्यांमध्ये प्रचंड चलनवाढ झाली. अशा प्रकारे संपत्ती किंमतींमध्ये झालेली चलनवाढ, शिवाय याच संपत्तीबाबतची सट्टेबाजी, यांमुळं संपत्ती खरेदीसाठीच्या वित्तपुरवठ्याकरिता उसनवारी करण्यातही वाढ झाली. संपत्ती मूल्यांमधील चलनवाढीला यातून प्रोत्साहनच मिळालं आणि सट्टेबाजीचा वारूही अधिक वेगानं उधळला. सट्टेबाजांचं पतमूल्य त्यांच्याकडील संपत्तीच्या बाजारपेठीय मूल्यावर ठरत असतं आणि कर्जपुरवठा करणाऱ्या बँकेसाठी तारण म्हणूनही त्याचा उपयोग होतो.

संख्यात्मक सहजतेतून रोकडसुलभता आली आणि विकसित भांडवली अर्थव्यवस्थांच्या 'वास्तव' भागांमधील कुंठितावस्थेमुळं भांडवली लाभाचे शेवटचे वाटे काबीज करण्यासाठीची स्पर्धा साहजिकपणेच सुरू झाली. त्यामुळं वित्त बाजारपेठांच्या पुरवठा आघाडीवर लगोलग आभासी चलनाचा 'वित्तीय नवशोध' उगवला. बिटकॉइन हे २००९ साली सुरू झालेलं अशा प्रकारचं पहिलं डिजीटल चलन होतं. आपल्या व्यवहारांच्या सुरक्षिततेसाठी, अतिरिक्त केंद्रांच्या निर्मितीसाठी व हस्तांतरणाच्या तपासणीसाठी हे चलन क्रिप्टोग्राफीचा वापर करतं. बिटकॉइनचं अंतःस्थ विकेंद्रित खातेवही तंत्रज्ञान- ब्लॉकचेन- वापरणाऱ्या उद्योगांचे समभाग रोखे बाजारात अपेक्षेप्रमाणे वेगानं वधारत आहेत. बिटकॉइन आणि इतर आभासी चलनांच्या अतिरिक्त केंद्रांच्या निर्मितीसाठी स्थापन झालेल्या उद्योगांचे (आभासी चलन 'खाणकाम', असं या प्रक्रियेला संबोधलं जातं) समभागही उच्चांक गाठत आहे.

इंटरनेटशी संबंधित उद्योग करत असल्याचा दावा

करणाऱ्या कंपन्यांचे समभाग १९९९ साली गगनाला भिडले होते, त्याला 'डॉट-कॉम बुडबुडा' असं संबोधलं गेलं होतं. त्याची आठवण बिटकॉइनच्या संदर्भातही होते. अविवेकी उत्साहानं पुन्हा एकदा वर्चस्व गाजवायला सुरुवात केली आहे. काही प्रमाणात अतिशयोक्ती करून असं म्हणता येईल की, तुम्हाला कंपनीच्या समभागाचं मूल्य वेगानं वाढवायचं असेल, तर केवळ तिचं नाव बदला- 'लाँग आयलंड आइस्ड टी कॉर्प'नं स्वतःचं नाव 'लाँग ब्लॉकचेन कॉर्प' केलं, तसं करा! तसंही, हे वित्तीय उत्पादन आणि प्रक्रियात्मक नवशोधन म्हणजे इंटरनेट क्रांतीचा दुसरा टप्पा असल्याचा गाजावाजा बिटकॉइन व ब्लॉकचेनचे प्रवक्ते करत आहेतच की! डॉलर, यूरो किंवा रुपया यांसारख्या चलनांबाबत केंद्रीय अधिकारीसंस्थेवर (केंद्रीय बँकेवर) आणि व्यावसायिक बँकिंग व्यवस्थेतील वित्तीय मध्यस्थांवर किंवा आपापल्या केंद्रीय बँकांना पाठिंबा देणाऱ्या राज्यसंस्थेच्या व्यवस्थेवर भरवसा ठेवावा लागतो, परंतु बिटकॉइनच्या बाबतीत अशी परिस्थती नसल्याचा दावा या समर्थकांकडून केला जातो आहे. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून जागतिक वित्तपुरवठ्याच्या युगात प्रवेश करता येईल आणि या बाजारपेठेला कोणत्याही केंद्रीय बँकेच्या किंवा वित्तीय अधिकारीसंस्थेच्या नियमांचं वा नियमनांचं बंधन सहन करावं लागणार नाही, अशी ही मांडणी आहे!

हा गाजावाजा बाजूला ठेवून बिटकॉइन-ब्लॉकचेन बुडबुड्याच्या येऊ घातलेल्या स्फोटाचा प्रश्न विचारात घ्यावा लागतो. २००७साली बीअर स्टर्न्स कंपनीच्या दोन बचाव निधींना अपयश आलं होतं आणि त्यानंतर अतिशय जोखमीचं तारण ठेवणाऱ्या कर्ज उत्तरदायीत्व बाजारपेठेला गोठवण्यात आलं होतं. त्या वर्षी, थोडं आधी, जून महिन्यात फेडरल रिझर्वचे तत्कालीन अध्यक्ष बेन बर्नान्की यांनी असा दावा केला होता की, गहाण कर्जांवर आधारित बाजारपेठांचा तारणसंबंधित कारणांवरून स्फोट झाल्यास त्याचा एकूण वित्तीय व्यवस्थेवर कोणताही मोठा विपरित परिणाम होणार नाही. या तारणांविषयीची सट्टेबाजी आणि व्यापक वित्तव्यवस्था यांच्यातील सूक्ष्म परस्परसंबंधांमुळं वित्तीय महासंकट निर्माण होऊ शकतं, हे बर्नान्की यांना माहीत नव्हतं का?

बिटकॉइन-ब्लॉकचेन यांचं उधळलेलं वारू आणि इतर संपत्ती बाजारपेठा, बँक कर्जपुरवठा, पत बाकी अदलाबदल यांच्यातील सूक्ष्म संबंध काय आहेत? खरं तर, आपल्याला याची कोणतीही कल्पना नाही. परंतु, संपत्ती किंमतीचा मोठा बुडबुडा फुटतो आणि त्यातील अंतःस्थ तारण नष्ट होतं, तेव्हा वित्तसंस्था व बाजारपेठांवर आणि सर्व देशांमध्ये अरिष्ट कोसळू शकतं, हे मात्र आपल्याला माहीत आहे.

परंतु यातील मुख्य मुद्दा हा आहे की, विकसित भांडवली देशांमधील दीर्घकालीन आर्थिक कुंठितावस्था कायम असल्यामुळं उत्पादकीय गुंतवणूक नव्हे, तर सट्टेबाजीचा वित्तपुरवठा आर्थिक वृद्धीचा मुख्य कारक घटक बनला आहे. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, ही आर्थिक व्यवस्था चालू ठेवण्यासाठी वित्तीय बुडबुड्यांची अशी मालिका गरजेची ठरते. अशा प्रकारच्या वित्तपुरवठ्यातून निर्माण झालेल्या सांपत्तिक परिणामामुळं (उत्पन्न वाढलं नाही तरी संपत्तीच्या किंमतींमधील वाढीमुळं उपभोगात वाढ होण्यासाठीची वृत्ती) वास्तविक अर्थव्यवस्थेला उत्तेजना मिळते. परंतु हा वित्तीय बुडबुडा फुटतो, तेव्हा वास्तविक अर्थव्यवस्था कोसळते. आधीच्या वित्तीय वारूंप्रमाणे बिटकॉइन-ब्लॉकचेन यांविषयीच्या अवाजवी आकर्षणातूनही भांडवलशाहीचा कोणत्याही मार्गानं संपत्ती जमवायला हव्यास दिसून येतो. मग या युक्त्यांमधून व्यापक लोकसमूहाच्या खऱ्या गरजा भागवल्या जातात किंवा नाही, याच्याशी या व्यवस्थेला काहीही देणंघेणं राहात नाही. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(१३ व २० जानेवारी २०१८ या अंकांतून)